RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ६५(२)] गुरुवार, मे २१, २०२६/वैशाख ३१, शके १९४८ [पृष्ठे १२, किंमत : रुपये १५.००

असाधारण क्रमांक २०३

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

नगरविकास विभाग

मंत्रालय, ४ था मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ मे, २०२६.

अधिसूचना

भारतीय संविधान.

क्रमांक असशे-२०२०/प्र.क्र.१४०/नवि-१४.— भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ खालील परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून आणि या संदर्भातील अस्तित्वात असलेले सर्व संबंधित विद्यमान नियम, आदेश किंवा अनुदेश अधिक्रमित करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालयातील अग्निशमन केंद्र अधिकारी, वरिष्ठ प्रशिक्षक, गट-ब (अराजपात्रित), उप अग्निशमन अधिकारी, कनिष्ठ प्रशिक्षक, अग्निशामक विमोचक, अग्निशामक, चालक यंत्रचालक, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक, अधिक्षक, लेखापाल, वरिष्ठ लिपिक, वसतीगृह भांडारपाल (गट-क) या पदांच्या सेवाप्रवेशाचे विनिमय करणारे नियम करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. (१) या नियमांना महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालयातील गट-ब (अराजपत्रित) व गट-क पदांचे (सेवाप्रवेश) नियम, २०२६ म्हणून संबोधण्यात येईल.

(२) सदर नियम **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालयातील अग्निशमन केंद्र अधिकारी, वरिष्ठ प्रशिक्षक, गट-ब (अराजपत्रित), उप अग्निशमन अधिकारी, कनिष्ठ प्रशिक्षक, अग्निशामक विमोचक, अग्निशामक, चालक यंत्रचालक ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक, अधिक्षक, लेखापाल, वरिष्ठ लिपिक, वसतीगृह भांडारपाल (गट-क) या पदावर नियुक्ती करण्यास सक्षम असणारा संचालक, महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा असा आहे.;

(ब) "पदवी" याचा अर्थ वैधानिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी किंवा शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली कोणतीही अन्य पात्रता.

(क) "विभाग" याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा नगरविकास विभाग असा आहे;

(ड) "संचालनालय" याचा अर्थ नगरविकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालय असा आहे.

(इ) "पदोन्नतीसाठी पात्रता" याचा अर्थ सामान्य प्रशासन विभागाने पदोन्नतीच्या पात्रतेबाबत वेळोवेळी नियम, परिपत्रक किंवा आदेश यानुसार विहित केलेल्या अटी व शर्ती या नुसारची पदोन्नतीसाठीची पात्रता;

(फ) "शासन" म्हणजे महाराष्ट्र शासन;

(ग) "निवडसमिती" याचा अर्थ, महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालयातील अग्निशमन केंद्र अधिकारी, वरिष्ठ प्रशिक्षक, गट-ब (अराजपात्रित), उप अग्निशमन अधिकारी, कनिष्ठ प्रशिक्षक, अग्निशामक विमोचक, अग्निशामक, ग्रंथपाल, प्रयोगशाळा सहाय्यक, अधिक्षक, लेखापाल, वरिष्ठ लिपिक, वसतीगृह भांडारपाल (गट-क) सरळसेवेने नियुक्ती देण्याकरीता गठीत केलेली समिती;

३. अग्निशमन केंद्र अधिकारी किंवा वरिष्ठ प्रशिक्षक, गट-ब (अराजपात्रित) या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील,—

(अ) महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालयाच्या अंतर्गत उप अग्निशमन अधिकारी किंवा कनिष्ठ प्रशिक्षक, गट-क या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या तसेच, या नियमाच्या पोट-कलम (ब) मधील खंड (ii) व (iii) मधील शैक्षणिक अर्हता व तांत्रिक अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून, ज्येष्ठतेच्याआधारे पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने; किंवा

(ब) निवडसमितीद्वारे घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परिक्षेच्या निकालाआधारे व नियुक्ती प्राधिकारी यांनी शिफारस करण्यात आलेल्या व खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे :—

(i) वयोमर्यादा :

(१) किमान वयोमर्यादा : सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास १८ वर्षे पूर्ण असावे.

(२) कमाल वयोमर्यादा : सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास अमागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय ३८ वर्ष पुर्ण पेक्षा अधिक नसावे आणि मागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय ४३ वर्ष पूर्ण पेक्षा अधिक नसावे;

(ii) किमान शैक्षणिक पात्रता: खालील नमुद एक पात्रता उमेदवाराकडे असणे आवश्यक,—

(अ) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय (एनएफएससी), नागपूर किंवा अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषदेशी संलग्न मान्यताप्राप्त विद्यापीठ (एआयसीटीई) यांच्याकडील अग्निशमन अभियांत्रिकी पदवी; किंवा

(ब) सांविधिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी आणि खाली नमूद केलेल्या तांत्रिक अर्हतेपैकी एक तांत्रिक अर्हता धारण करणे आवश्यक राहील :—

(अ) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय (एनएफएससी), नागपूर यांच्याकडील अग्निशमन पदविका उत्तीर्ण; किंवा

(ब) भारतीय अग्निशमन अभियांत्रिकी संस्था, नवी दिल्ली यांच्याकडील श्रेणी-एक (अग्निशमन-इंडिया) परीक्षा दि.३१.०५.२०१३ पूर्वी उत्तीर्ण; किंवा

(क) अग्निशमन अभियांत्रिकी संस्था, युनाईटेड किंगडम यांच्याकडील श्रेणी-एक (अग्निशमन-यु.के.) परीक्षा दि.०३.११.२०१७ पूर्वी उत्तीर्ण.

(iii) शारीरिक अर्हता:

(१) उंची : किमान १६५ से.मी.(पुरुष) व किमान १५७ से.मी.(महिला).

(२) छाती: किमान ८१ से.मी. (साधारण) व किमान ८६ से.मी. (फुगविल्यानंतर)

(महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)

(३) दृष्टी : ६/६ (चश्माशिवाय)

४. उप अग्निशमन अधिकारी किंवा कनिष्ठ प्रशिक्षण (गट-क) या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील,—

(अ) महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालयाच्या अंतर्गत प्रमुख अग्निशामक-विमोचक किंवा अग्निशमन प्रणेता किंवा चालक-यंत्रचालक (गट-क) या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या तसेच, या नियमाच्या पोट-कलम (ब) मधील खंड (ii) मधील शैक्षणिक अर्हता व खंड (ii), (iii) व (iv) मधील तांत्रिक अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींच्या एकत्रित ज्येष्ठतासूचीतून, ज्येष्ठतेच्याआधारे पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने; किंवा

(ब) निवड समितीद्वारे घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परिक्षेच्या निकाला आधारे व नियुक्ती प्राधिकारी यांनी शिफारस करण्यात आलेल्या व खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे :—

(i) वयोमर्यादा :

(१) किमान वयोमर्यादा : सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास १८ वर्षे पूर्ण असावे.

(२) कमाल वयोमर्यादा : सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास अमागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय ३८ वर्ष पुर्ण पेक्षा अधिक नसावे आणि मागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय ४३ वर्ष पूर्ण पेक्षा अधिक नसावे;

(ii) किमान शैक्षणिक अर्हता: सांविधिक विद्यापिठाची कोणत्याही शाखेतील पदवी

(iii) तांत्रिक अर्हता: खालीलपैकी एक तांत्रिक अर्हता उमेदवाराकडे असणे आवश्यक,—

(अ) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय (एनएफएससी), नागपूर यांच्याकडील उप अग्निशमन अधिकारी पाठ्यक्रम किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी (एमएफएसए), मुंबई यांच्याकडील एक वर्ष कालावधीचा उप स्थानक अधिकारी व अग्नि प्रतिबंधक अधिकारी हा पाठ्यक्रम उत्तीर्ण.

(ब) भारतीय अग्निशमन अभियांत्रिकी संस्था, नवी दिल्ली यांच्याकडील श्रेणी-एक (अग्निशमन-इंडिया) परीक्षा दि.३१.०५.२०१३ पूर्वी उत्तीर्ण.

(क) अग्निशमन अभियांत्रिकी संस्था, युनाईटेड किंगडम यांच्याकडील श्रेणी-एक (अग्निशमन-यु.के.) परीक्षा दि.०३.११.२०१७ पूर्वी उत्तीर्ण.

(iii) शारीरिक अर्हता:

(१) उंची : किमान १६५ से.मी.(पुरुष) व किमान १५७ से.मी.(महिला).

(२) छाती : किमान ८१ से.मी. (साधारण) व किमान ८६ से.मी. (फुगविल्यानंतर)

(महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)

(३) दृष्टी : ६/६ (चश्माशिवाय)

५. प्रमुख अग्निशामक-विमोचक किंवा अग्निशमन प्रणेता (गट-क) या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील,- महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालयाच्या अंतर्गत अग्निशामक किंवा अग्निशामक विमोचक (गट-क) या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या, खालील अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून, ज्येष्ठतेच्याआधारे पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीनेः-

(i) महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी (एमएफएसए), मुंबई किंवा राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांच्याकडील सहा महिने अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांच्याकडून मान्यताप्राप्त खाजगी संस्थेकडून सहा महिन्याचा अग्निशमन पाठ्यक्रम उत्तीर्ण असलेला.

(ii) जड वाहन चालविण्याचा वैध परवाना.

६. चालक-यंत्रचालक (गट-क) या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील,- महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालयाच्या अंतर्गत अग्निशामक-विमोचक किंवा अग्निशामक (गट-क) या पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नसलेली सलग नियमित सेवा झालेल्या व जड वाहन चालविण्याचा वैद्य परवाना ही अर्हता धारण करीत असलेली योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने.

७. अग्निशामक-विमोचक किंवा अग्निशामक (गट-क) या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील,- निवडसमितीद्वारे घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परिक्षेच्या निकाला आधारे शिफारस करण्यात आलेल्या व खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारेः-

(i) वयोमर्यादा :

(१) किमान वयोमर्यादा : सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास १८ वर्षे पूर्ण असावे.

(२) कमाल वयोमर्यादा : सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास अमागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय २५ वर्ष पुर्ण पेक्षा अधिक नसावे आणि मागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय ३० वर्ष पूर्ण पेक्षा अधिक नसावे;

(ii) किमान शैक्षणिक अर्हताः माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.

(iii) तांत्रिक अर्हता : महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी (एमएफएसए), मुंबई किंवा राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, मुंबई यांच्याकडील सहा महिन्यांचा अग्निशमन प्रशिक्षण पाठ्यक्रम किंवा महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांच्याकडून मान्यताप्राप्त खाजगी संस्थेकडून सहा महिन्यांचा अग्निशमन पाठ्यक्रम उत्तीर्ण असलेला.

(iii) शारिरीक अर्हताः

(१) उंची : किमान १६५ से.मी.(पुरुष) व किमान १५७ से.मी.(महिला).

(२) छाती : किमान ८१ से.मी. (साधारण) व किमान ८६ से.मी. (फुगविल्यानंतर)

(महिला उमेदवारांसाठी लागू नाही.)

(३) दृष्टी : ६/६ (चश्माशिवाय)

८. ग्रंथपाल (गट-क) या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील,- निवडसमितीद्वारे घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परिक्षेच्या निकाला आधारे शिफारस करण्यात आलेल्या व खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारेः-

(i) वयोमर्यादा :

(१) किमान वयोमर्यादा : सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास १८ वर्षे पूर्ण असावे.

(२) कमाल वयोमर्यादा : सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास अमागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय ३८ वर्ष पुर्ण पेक्षा अधिक नसावे आणि मागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय ४३ वर्ष पूर्ण पेक्षा अधिक नसावे;

(ii) किमान शैक्षणिक पात्रता : सांविधिक विद्यापीठाची ग्रंथपाल विज्ञान शाखेची पदवी;

९. प्रयोगशाळा सहाय्यक (गट-क) या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील,- निवडसमितीद्वारे घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परिक्षेच्या निकाला आधारे शिफारस करण्यात आलेल्या व खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे :—

(i) वयोमर्यादा :

(१) किमान वयोमर्यादा : सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास १८ वर्षे पूर्ण असावे.

(२) कमाल वयोमर्यादा : सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास अमागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय ३८ वर्ष पुर्ण पेक्षा अधिक नसावे आणि मागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय ४३ वर्ष पूर्ण पेक्षा अधिक नसावे;

(ii) किमान शैक्षणिक पात्रता : रसायन शास्त्र या मुख्य विषयासह सांविधिक विद्यापीठाची विज्ञान शाखेची पदवी;

१०. अधिक्षक (गट-क) या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील,-

(अ) महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालयाच्या अंतर्गत वरिष्ठ लिपिक, गट-क या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून, ज्येष्ठतेच्याआधारे पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने.

(ब) प्रतिनियुक्ती, वरिष्ठ लिपिक, गट-अ या पदावरील पदोन्नतीच्या मार्गाने उमेदवार उपलब्ध होत नसेल तरच, शासकीय /

निमशासकीय कार्यालयातील अधिक्षक, गट-क या संवर्गातील अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीद्वारे बदलीने योग्य उमेदवाराची नियुक्ती करण्यात येईल.

११. लेखापाल (गट-क) या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील,- शासकीय/ निमशासकीय कार्यालयातील लेखा विषयक अनुभव असलेल्या समकक्ष वेतनश्रेणीतील अधिकारी/ कर्मचाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येईल.

१२. वरिष्ठ लिपिक (गट-क) या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील,-महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालयाच्या अंतर्गत लिपिक-टंकलेखक, गट-क या पदावर तीन वर्षपिक्षा कमी नसेल इतकी सलग नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून, ज्येष्ठतेच्याआधारे पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने.

१३. वसतीगृह भांडारपाल (गट-क) या पदावरील नियुक्त्या पुढील मार्गाने करण्यात येतील,-निवडसमितीद्वारे घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परिक्षेच्या निकाला आधारे शिफारस करण्यात आलेल्या व खालील अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारामधून नामनिर्देशनाद्वारे :—

(i) **वयोमर्यादा** :

(१) किमान वयोमर्यादा : सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास १८ वर्षे पूर्ण असावे.

(२) कमाल वयोमर्यादा : सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्विकृतीच्या अंतिम दिनांकास अमागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय ३८ वर्ष पुर्ण पेक्षा अधिक नसावे आणि मागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय ४३ वर्ष पूर्ण पेक्षा अधिक नसावे;

(ii) किमान शैक्षणिक अर्हताः सांविधिक विद्यापिठाची पदवी.

१४. नियम ३ ते १३ मध्ये नमूद केलेल्या पदांवरील नियुक्त्या या नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने केल्या जातील.

१५. (अ) नियम ३ येथील नमूद पदांवर पदोन्नती व नामनिर्देशन याद्वारे नियुक्तीचे प्रमाणे अनुक्रमे ०५:९५ असे राहील.

(ब) नियम ४ मध्ये नमूद पदांवर पदोन्नती व नामनिर्देशन याद्वारे नियुक्तीचे प्रमाण अनुक्रमे ४०:६० असे राहीलः

परंतु असे की, पदोन्नतीने नियुक्ती देण्याकरीता योग्य उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या सहमतीने त्या विशिष्ठ भरती वर्षासाठी पदोन्नती व नामनिर्देशन याद्वारे करावयाच्या नियुक्तीचे प्रमाण शिथिल करून सदर पदे नामनिर्देशनाद्वारे भरता येतील.

१६. (अ) नियम ३ मधील नमूद पदांवर नामनिर्देशनाने नियुक्त होणारी व्यक्ती ही दोन वर्षांच्या कालावधीकरीता परिविक्षाधीन राहील. परिविक्षाधीन कालावधी हा नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या अधिकाराने कमाल एका वर्षाने वाढविता येईल. सदर परिविक्षाधीन कालावधी (वाढीव कालावधीसह) विहीत केलेले प्रशिक्षण पुर्ण करणे आवश्यक राहील. तसेच, शासनाच्या परिविक्षाधीन धोरणानुसार परिविक्षाधीन कालावधी (वाढीव कालावधीसह) समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. तथापि, परिविक्षाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

(ब) नियम ४ व ७ मधील नमूद पदांवर नामनिर्देशनाने नियुक्त होणारी व्यक्ती ही एक वर्षांच्या कालावधीकरीता परिविक्षाधीन राहील. परिविक्षाधीन कालावधी हा नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या अधिकाराने कमाल एका वर्षाने वाढविता येईल. सदर परिविक्षाधीन कालावधी (वाढीव कालावधीसह) विहीत केलेले प्रशिक्षण पुर्ण करणे आवश्यक राहील. तसेच, शासनाच्या परिविक्षाधीन धोरणानुसार परिविक्षाधीन कालावधी (वाढीव कालावधीसह) समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. तथापि, परिविक्षाधीन कालावधीत विहित केलेले प्रशिक्षण पूर्ण न केल्यास किंवा शासनाच्या परिविक्षाधीन धोरणानुसार परिविक्षिाधीन कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.

१७. (१) सदर पदावर पदोन्नतीने नियुक्ती होण्यापूर्वी मराठी व हिंदी भाषेची परीक्षा उत्तीर्ण झाले अथवा त्यापासून सूट मिळाली असल्याची बाब वगळता, नियम ३, ४, ५, ६, १० व १२ मधील नमूद पदांवर पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार मराठी व हिंदी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

(२) सदर पदावर पदोन्नतीने नियुक्ती होण्यापूर्वी मराठी व हिंदी भाषेची परीक्षा उत्तीर्ण झाले अथवा त्यापासून सूट मिळाली असल्याची बाब वगळता, नियम ३, ४, ७, ८, ९ व १३ मधील नमूद पदांवर पदोन्नतीने नियुक्त व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार मराठी व हिंदी भाषेची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. सदर परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय पुढील वार्षिक वेतनवाढ

अथवा पदोन्नतीच्या पुढील पदावर पदोन्नतीने नियुक्त होण्यासाठी सदर व्यक्तीला पात्र समजण्यात येणार नाही.

१८. (अ) सदर पदावर पदोन्नतीने नियुक्ती होण्यापूर्वी संगणक अर्हता प्रचालन प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट मिळाली असल्याची बाब वगळता, नियम ३, ४, ५, ६, १० व १२ मधील नमूद पदांवर नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियम अथवा आदेशानुसार विहित संगणक अर्हता प्रचालन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

(२) सदर पदावर नामनिर्देशनाने नियुक्ती होण्यापूर्वी संगणक अर्हता प्रचालन प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट मिळाली असल्याची बाब वगळता, नियम ३, ४, ७, ८, ९ व १३ मधील नमूद पदांवर नामनिर्देशनाने नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियम अथवा आदेशानुसार विहित संगणक अर्हता प्रचालन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र धारण केल्याशिवाय पुढील वार्षिक वेतनवाढ अथवा पदोन्नतीच्या पुढील पदावर पदोन्नतीने नियुक्त होण्यासाठी सदर व्यक्तीला पात्र समजण्यात येणार नाही.

१९. (१) नियम ३, ४, ७, ८, ९ व १३ नमूद पदांवर नामनिर्देशनाने नियुक्त होण्यासाठी शिफारस होणाऱ्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (छोटे कुटुंब घोषणापत्र) नियम, २००५ अथवा शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियम, आदेश अथवा संलेखानुसार छोट्या कुटुंबाबाबत घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.

(२) छोटे कुटुंब घोषणापत्र सादर करण्याच्या दिनांकास दोन अपत्यांपेक्षा जास्त असणारी व्यक्ती शासकीय सेवेत नियुक्ती मिळण्यास अपात्र असेल.

(३) शासकीय सेवेत नियुक्ती मिळाल्यानंतर एखाद्या व्यक्तीस नियुक्तीच्या वेळेस अथवा त्यानंतर दोन पेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिद्ध झाल्यास शासन सेवेतील सदर पदावर कार्यरत राहण्यासाठी अपात्र ठरविण्यात येईल.

२०. नियम ३ व ४ येथील पदांवर नियुक्त होणाऱ्या व्यक्तींची सेवाज्येष्ठता यादी ही राज्य स्तरावर ठेवण्यात येईल. त्यामुळे, सदर व्यक्ती ही महाराष्ट्र राज्यात कुठेही बदली होण्यास पात्र असेल.

२१. कोणत्याही शासकीय सेवकाची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर शासनाने वेळोवेळी जारी केलेले नियम, आदेश अथवा निर्णय यामधील अटी व शर्ती संबंधीत शासकीय सेवकास लागू असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

प्रियांका कुलकर्णी-छापवाले,
शासनाच्या उप सचिव.

URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Mantralaya, 4th Floor, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumabi 400 032, Dated 21st May, 2026.

NOTIFICATION

CONSTITUTION OF INDIA.

No.FFS-2020/C.R.140/UD-14.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Fire Station Officer, Senior Instructor, Group-B (Non-Gazetted), Sub-Fire Officer , Junior Instructor Leading, Fireman Rescuer, Leading Fireman, Driver Operator, Librarian, Laboratory Assistant, Fireman Rescuer, Fireman, Superintendent, Accountant, Senior Clerk, Hostel Store Keeper (Group-C) in the office of Directorate of the Maharashtra Fire and Emergency Services under the administrative control of the Urban Development Department of Government of Maharashtra, namely :—

1. (1)These rules may be called the Group-B (Non-Gazetted) and Group-C posts in the office of the Directorate of the Maharashtra Fire and Emergency Services (Recruitment) Rules, 2026.

(2) These rules shall come into force from the date of publication in the *Maharashtra Government Gazette*.

2. In these rules, unless the context requires otherwise, —

(a) "Appointing Authority" means the Director, Directorate of the Maharashtra Fire and Emergency Services in relation to the posts of Fire Station Officer, Senior Instructor, Group-B (Non-Gazetted), Sub Fire Officer, Junior Instructor, Leading Fireman Rescuer, Leading Fireman, Driver Operator, Librarian, Laboratory Assistant, Fireman Rescuer, Fireman, Superintendent, Accountant, Senior Clerk, Hostel Store Keeper (Group-C);

(b) "degree" means degree of any discipline of a statuary university or any other qualification declared by the Government to be equivalent thereto;

(c) "Department" means the Department of Urban Development Department of the Government of Maharashtra;

(d) "Directorate" means the Directorate of Maharashtra Fire and Emergency Services under the administrative control of Urban Development Department;

(e) "Eligibility for promotion" means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified in the rules, resolutions or order issued by the General Administrative Department of the Government, from time to time;

(f) "Government" means the Government of Maharashtra;

(g) "Selection Committee" means the Committee constituted from time to time by the Urban Development Department for the purpose of selection of candidates by direct recruitment to the posts of Fire Station Officer, Senior Instructor, Group-B (Non-Gazetted), Sub-Fire Officer, Junior Instructor, Leading Fireman Rescuer, Leading Fireman, Driver Operator, Librarian, Laboratory Assistant, Fireman Rescuer, Fireman, Superintendent, Accountant, Senior Clerk, Hostel Store Keeper (Group-C).

3. Appointment to the post of Fire Station Officer or Senior Instructor, Group-B (Non-Gazetted) shall be made either, —

(a) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Sub-Fire Officer or Junior Instructor (Group-C) in the office of the Directorate and having not less than three years regular and continuous service on the said posts alongwith minimum educational qualification and physical eligibility as mentioned in sub-clauses (ii) and (iii) of clause (b)respectively; or

(b) by nomination from amongst the candidates recommended by the Selection Committee on the basis of the result of the Competitive Examination conducted therefor, who fulfils the following criteria, namely :—

(i) Age Limit.-

(A) Lower Age Limit.- Eighteen years of age completed as on the last date of receipt of application as per the advertisement for recruitment to the said post.

(B) Upper Age Limit.- Thirty-eight years of age completed for the persons not belonging to reserved category and forty-three years of age for the persons belonging to reserved category as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post.

(ii) Minimum Educational Qualifications.- A candidate shall possess,—

(a) a degree in Fire Engineering awarded by the National Fire Service College (NFSC), Nagpur or any recognised university accredited with All India Council of Technical Education (AICTE), or

(b) a degree alongwith one of the following technical qualification, namely:-

(A) Diploma in Fire Engineering awarded by the National Fire Service College (NFSC), Nagpur, or

(B) Graduateship Examination of Institute Fire Engineering in India prior to 31.05.2013; or

(C) Graduateship Examination of Institute of Fire Engineering (U.K) prior to 03.11.2017.

(iii) Physical Eligibility :—

(A) Height : 165 centimeter for Male candidates and 157 centimeter for Female candidates.

(B) Chest : minimum 81 centimeter (normal) and minimum 86 centimeter (after expansion) (not applicable for woman candidates).

(C) Eyesight (Vision) - 6/6 without spectacles.

4. Appointment to the post of Sub Fire Officer or Junior Instructor (Group-C), shall be made either,—

(a) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Leading Fireman Rescuer or Leading Fireman or Driver Operator (Group-C) in the office of Directorate and having not less than three years regular and continuous service on the said posts alongwith minimum educational qualification, technical qulaification and physical eligibility as mentioned in sub-clauses (ii), (iii) and (iv) of clause (b) respectively; or

(b) by nomination from amongst the candidates recommended by the Selection Committee on the basis of the result of the Competitive Examination conducted therefor, who fulfils the following criteria, namely :—

(i) Age Limit.—

(A) Lower Age Limit.— Eighteen years of age completed as on the last date of receipt of application as per the advertisement for recruitment to the said post.

(B) Upper Age Limit.- Thirty-eight years of age completed for the persons not belonging to reserved category and forty-three years of age for the persons belonging to reserved category as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post.

(ii) Minimum Educational Qualifications.- A candidate shall possess a degree.

(iii) Technical Qualification.-A candidate shall possess one of the following technical qualification, namely :—

(A) Sub-Officer Course awarded by the National Fire Service College (NFSC), Nagpur or One Year Sub-Officer and Fire Prevention Officer Course awarded by the Maharashtra

Fire Service Academy (MFSA), Kalina, Mumbai, or

(B) Graduateship Examination of Institute Fire Engineering in India prior to 31.05.2013, or

(C) Graduateship Examination of Institute of Fire Engineering (U.K) prior to 03.11.2017.

(iv) Physical Eligibility :—

(A) Height : 165 centimeter for Male candidates and 157 centimeter for Female candidates.

(B) Chest : minimum 81 centimeter (normal) and minimum 86 centimeter (after expansion) (not applicable for woman candidates).

(C) Eyesight (Vision) - 6/6 without spectacles.

5. Appointment to the post of Leading Fireman Rescuer or Leading Fireman (Group-C), shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Fireman Rescuer or Fireman (Group-C) in the office of Directorate and having not less than three years regular and continuous service on the said posts and,—

(a) possess a certificate of Fireman Training from Maharashtra Fire Service Academy, (MFSA) or State Fire Training Centre, Kalina, Mumbai or six months Fireman Course from the Private Institute recognised by the Directorate and

(b) hold Driving License of Heavy Vehicle.

6. Appointment to the post of Driver Operator (Group-C), shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Fireman Rescuer or Fireman (Group-C) in the office of Directorate and having not less than three years regular and continuous service on the said posts and possess Driving License of Heavy Vehicle.

7. Appointment to the post of Fireman Rescuer or Fireman (Group-C), shall be made by nomination from amongst the candidates recommended by the Selection Committee on the basis of the result of the Competitive Examination conducted therefor, who fulfils the following criteria, namely:-

(i) Age Limit.-

(A) Lower Age Limit.- Eighteen years of age completed as on the last date of receipt of application as per the advertisement for recruitment to the said post.

(B) Upper Age Limit.- Twenty-five years of age completed for the persons not belonging to reserved category and thirty years of age for the persons belonging to reserved category as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post.

(ii) Minimam Education Quaalification. — A candidate shall have passed Secondary School Certificate.

(iii) Technical Qualification.— A candidat shall Posses a certificate of Fireman Training from Maharashtra Fire Services Acadamy, (MFSA) or State Fire Training Centre, Kalina, Mumbai or Six Months Fireman Course from the Private Istitute recognised by the Directorate.

(iv) Physical Eligibility :—

(A) Height : 165 centimeter for Male candidates and 157 centimeter for Female candidates.

(B) Chest : minimum 81 centimeter (normal) and minimum 86 centimeter (after expansion) (not applicable for woman candidates).

(C) Eyesight (Vision) - 6/6 without spectacles.

8. Appointment to the post of Librarian (Group-C), shall be made by nomination from amongst the candidates recommended by the Selection Committee on the basis of the result of the Competitive Examination conducted therefor, who fulfils the following criteria, namely:-

(i) Age Limit.-

(A) Lower Age Limit.- Eighteen years of age completed as on the last date of receipt of application as per the advertisement for recruitment to the said post.

(B) Upper Age Limit.- Thirty-eight years of age completed for the persons not belonging to reserved category and forty-three years of age for the persons belonging to reserved category as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post.

(ii) Minimum Educational Qualifications.- A candidate shall possess a degree in Library Science.

9. Appointment to the post of Laboratory Assistant(Group-C), shall be made by nomination from amongst the candidates recommended by the Selection Committee on the basis of the result of the Competitive Examination conducted therefor, who fulfils the following criteria, namely :—

(i) Age Limit.—

(A) Lower Age Limit.- Eighteen years of age completed as on the last date of receipt of application as per the advertisement for recruitment to the said post.

(B) Upper Age Limit.- Thirty-eight years of age completed for the persons not belonging to reserved category and forty-three years of age for the persons belonging to reserved category as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post.

(ii) Minimum Educational Qualifications.- A candidate shall possess a degree in Science with Chemistry as main subject.

10. Appointment to the post of Superintendent (Group-C), shall be made either by,—

(a) promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Senior Clerk (Group-C) in the office of Directorate and having not less than three years regular and continuous service on the said post; or

(b) Deputation, if eligible and suitable candidates for promotion from amongst the post of Senior Clerk (Group-C) is not available then, a suitable candidates shall be appointed by transfer on deputation from officers or employees having experience of post of Superintendent (Group-C) in Government or Semi Government Office.

11. Appointment to the post of Accountant (Group-C), shall be made by deputation from amongst the officers or employees having experience of account work in Government or Semi Government Office.

12. Appointment to the post of Senior Clerk (Group-C), shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Clerk-*cum*-typist (Group-C) in the office of Directorate and having not less than three years regular and continuous service on the said post.

13. Appointment to the post of Hostel Store keeper (Group-C), shall be made by nomination from amongst the candidates recommended by the Selection Committee on the basis of the result of the Competitive Examination conducted therefor, who fulfils the following criteria, namely:-

(A) Lower Age Limit.- Eighteen years of age completed as on the last date of receipt of application as per the advertisement for recruitment to the said post.

(B) Upper Age Limit.- Thirty-eight years of age completed for the persons not belonging to reserved category and forty-three years of age for the persons belonging to reserved category as on the last date of receipt of application as per advertisement for recruitment to the said post.

(ii) Minimum Educational Qualifications.- A candidate shall possess a degree.

14. Appointment to the posts mentioned in rules 3 to 13 shall be made with the approval of Appointing Authority.

15. (a) Appointment to the post mentioned in rule 3 by promotion and nomination shall be made

in the ratio of 5:95, respectively.

(b) Appointment to the post mentioned in rule 4 by promotion and nomination shall be made in the ratio of 40:60, respectively:

Provided that, if the suitable candidates for by promotion are not available, the ratio of the appointment by promotion and nomination may be relaxed for that recruitment year after the consent of the Appointing Authority.

16. (a) A person appointed by nomination to the post mentioned in rule 3 shall be on probation for a period of two years. The probation period may be extended up to one year. Completion of the probation period (including extended period) satisfactorily as per probation policy of the Government is mandatory. In the event of failing to complete the probation period (including extended period) as per probation policy of the Government, his services shall liable to be terminated.

(b) A person appointed by nomination to the post mentioned in rules 4 and 7 shall be on probation for a period of one years. The probation period may be extended upto one year. Completion of the probation period (including extended period) satisfactorily as per probation policy of the Government is mandatory. In the event of failing to complete the probation period (including extended period) as per probation policy of the Government. However, if the prescribed training is not completed during the probationary period, or if the probationary period is not completed satisfactorily in accordance with the Government's probation policy, their services shall be terminated.

17. (a) A person to be appointed to the posts mentioned in rules 3, 4, 5, 6, 10 and 12 by promotion shall pass the Marathi and Hindi languages examination as per the rules made in this behalf by the Government, from time to time unless he has already passed or has been exempted from passing those examinations, before getting promoted to the said post.

(b) A person appointed to the posts mentioned in rules 3, 4, 7, 8, 9 and 13 by nomination shall pass the Marathi and Hindi languages examination as per the rules made in this behalf by the Government, from time to time within the prescribed time limit after appointment, unless he has already passed or has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he passes those examinations.

18. (a) A person to be appointed to the posts mentioned in rules 3, 4, 5, 6, 10 and 12 by promotion shall possess a Certificate of Computer Operations prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he already possess such Certificate or has been exempted therefrom, before getting promoted to the said post.

(b) A person appointed to the post mentioned in rules 3, 4, 7, 8, 9 and 13 by nomination shall possess a Certificate of Computer Operations prescribed by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he already possessed or has been exempted from possessing such Certificate, otherwise, he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possesses the same.

19. (1) A person recommended for appointment by nomination to the post mentioned in rules 3, 4, 7, 8, 9 and 13 shall submit a declaration of Small Family as per the provision of the Maharashtra Civil Services (Declaration of Small Family) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(2) A person having more than two children on the date of submission of Declaration of Small Family shall be disqualified for the appointment in Government Service.

(3) After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in the Government service.

20. Person appointed to the post mentioned in rules 3 and 4 shall be liable to the transferred anywhere in the State of Maharashtra, as a seniority list of the said posts is maintained at State level.

21. The terms and condition specified by the Government, in any rules, or resolution issued by Government from time to time, before or subsequent to the appointment of any Government Servant shall also be applicable to the to the concerned government servant.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRIYANKA KULKARNI-CHHAPWALE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.